# वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती आय, कार्यालय वसई
ता.वसई, जि. पालघर ४०१२०१

दुरध्वनी क्र. : ०२५०-२३०९०२०/२३२२२५८/२३२३३४३
२३२२०२१, रुग्णालय : २३२२१२०
फॅक्स : ०२५० - २३०९८३५
Email – iprabhagbhandhkam@gmail.com

जा.क्र. : ववशम/तलाव/ २४३ /22-23
दिनांक : ७/२/२३

## फेर जाहीर दरपत्रक सुचना

या सुचनेव्दारे कळविण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती "आय" वसई कार्यक्षेत्रातील खालील यादीतील नमुद तलाव दोन वर्षाकरीता ठेका पध्दतीने मत्स्यसंवर्धनाकरीता देणेकामी दरपत्रक सुचना दि. १३/०२/२०२३ पासुन ते दि. २२/०२/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळुन) महानगरपालिकेच्या (vvmc.in) या संकेत स्थळावर तसेच प्रभाग समिती आय, वसई कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येत आहे. इच्छुक दरपत्रधारकाने सदर कामांचे दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये दि. २३/०२/२०२३ रोजी दु.३.०० वाजे पर्यंत प्रभाग समिती आय कार्यालयात सादर करावेत.

| अ.क्रं. | तलावाचे नाव | किमान देकार रक्कम (दोन वर्षारीता) | इसारा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | गावज्योती तलाव | रु.२२,९३८/- | रु.२३०/- |
| २ | तामतलाव | रु.१,१३,२६६/- | रु.११३३/- |
| ३ | बाभोळा रेळबाव तलाव | रु.३१,९८६/- | रु.३२०/- |
| ४ | देवाळे तलाव | रु. ६१,३५२/- | रु.६१४/- |
| ५ | मोठा माळ तलाव | रु.१,१३,५९६/- | रु.११३६/- |
| ६ | मुळगांव केरेपोंडे तलाव | रु.५५,०२०/- | रु. ५५१/- |
| ७ | सत्मे व्हिलेज | रु. ९७,२१६/- | रु.९७३/- |
| ८ | चोबारे तलाव | रु.२७,६२८/- | रु.२७७/- |

## अटी - शर्ती

१ तलावात मत्स्य बीज सोडुन व मासे, पकडणे, व मारणे या करीता २ वर्षाचा कालावधी राहील. सदरचा कालावधी कार्यादिशाच्या दिनांकापासुन ग्राहय धरणेत येईल.

२ ठेकेदाराने दर भरताना दोन वर्षासाठीचा दर नमुद करावयाचा आहे. त्या अनुषंगाने मंजुर दरपत्रकधारकास/ ठेकेदारास मंजुर रक्कमावर २% आयकर (I.T) भरणे बंधनकारक राहील.

३ इच्छुक दरपत्रक धारकाने महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागाची (कर विभाग, पाणीपट्टी विभाग तसेच वरील प्रकारच्या यापुर्वीच्या निविदेतील कोणतीही थकबाकी) नसलेबाबतचे प्रमाणपत्र दरपत्रकासोबत सादर करणे बंधनकारक आहे.

४ सदर विषयी दरपत्रक/कोटेशन फॉर्म नमुना वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय, वसई कार्यालयातुन दि. १३/०२/२०२३ ते दि. २२/०२/२०२३ पर्यंत दु. ३.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळुन) बांधकाम विभागाकडुन उपलब्ध करुन घ्यावा.

५ मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. २३/०२/२०२३ रोजी सायं ४.०० वा. अथवा तदनंतर सोयीनुसार मा. सहा.आयुक्त यांचे दालनात उपस्थित दरपत्रक धारक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

६ दरपत्रक सादर करतेवेळी सोबत खालील नमुद कागदपत्रे सादर करावीत.

अ) पॅनकार्ड व आधारकार्ड

ब) इसारा रक्कम धनाकर्ष

क) बँकखाते तपशिल नमुद करावा

ड) रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञापत्र

वरील नमुद केलेले कागदपत्रे दरपत्रकासोबत सादर केलेली नसल्यास ठेकेदारस अपात्र ठरवण्यात येईल.

७ मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नकारण्याचा अधिकार महापालिकेस राहील. व मा. आयुक्त व.वि.श.म यांचा निर्णय अंतिम राहील.

८ ज्या दरपत्रक धारकाचे दरपत्रक मंजुर होईल अश्या दरपत्रक धारकाने समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहुन रु.५००/- स्टँम्प पेपरवर करारनामा लिहुन दयावयाचा आहे.

सही/-

प्र. सहा. आयुक्त

प्रभास समिती आय

वसई-विरार शहर महानगरपालिका